

ठाणे

माधुरी नाईक

जुणे ठाणे – नविन ठाणे- आमचे ठाणे

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

जुणे ठाणे – नविन ठाणे- आमचे ठाणे

माधुरी अरविंद नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

जुणे ठाणे – नविन ठाणे- आमचे ठाणे (पर्यटन)

माधुरी अरविंद नाईक

लक्ष्मी पार्क फेज -२, बिल्डिंग नंबर ५

फ्लॅट नंबर – ६०४

लोकमान्यनगर, ठाणे- पश्चिम

मोबाईल नंबर- ९८२०२३४८९१

ईमेल- madhuri.jadhav26@yahoo.co.in

ब्लॉग : http://bhramangiri.blogspot.in/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

या पुस्तकात व्यक्त केलेली मते व नोंदी ही लेखिकेची असून प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

प्रकाशन : २३ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

माधुरी नाईक यांची आजवरची प्रकाशित पुस्तके

सज्जनगड सातारा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sajjangad_satara_madhuri_naik.pdf

खादेरी उंदेरी जलदुर्ग

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jaldurga_khanderi_underi.pdf

माहुलीगड

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/e_book_mahuligad.pdf

हम्पी बदामी ऐहोळे

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hampi_madhuri_naik.pdf

पुणे जिल्हा भाग १ व २

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_1_madhuri_a_naik.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_2_madhuri_naik.pdf

इंदोर उज्जैन मध्यभारत

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/indore_ujjain_madhuri_naik.pdf



माधुरी नाईक
सज्जनगड
सातारा


हंपी बदामी ऐहोळे
माधुरी नाईक

खांदेरी - उंदेरी


पुणे जिल्हा
पुणे जंक्शन
PUNE JUNCTION
माधुरी नाईक


पुणे जिल्हा२
माधुरी नाईक

माधुरी अरविंद नाईक

भटकंती सर्वांनाच आवडते. नवनवीन प्रदेश, गावं पहावी, तिथले खाद्यपदार्थ चाखावे, वेगवेगळया लोकांना भेटावे हे अगदी लहान मोठ्या सर्वांनाच आवाडते. पण आपण जिथे जाऊ त्या ठिकाणाची माहिती देऊन इतर लोकांनाही त्या ठिकाणाची सफ़र घडवून आणायची या इच्छॆने त्या प्रवासाच्या नोंदीजपून ठेवणे आणि फ़ोटो जमा करून त्या सर्वांचा उपयोग करून्त्यांची ई पुस्तके बनवून लाखो लोकांना विनामूल्य देणे हा माधुरी नाईक यांचा छंद आहे. ई साहित्य प्रतिष्ठानच्या दुर्ग आणि प्रवास विभागाच्या मुख्य माधुरी नाईक या व्यवसायाने डिझायनर आहेत. त्यांचे पती अरविंद नाईक यांच्यासह त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या कोअर कमिटीच्या सबासद आहेत.

आपणही आपल्या प्रवासाची माहिती , नोंदी आणि फ़ोटो त्यांना पाठवून अशच तर्‌हेने पर्यटकांना मदत करूया आणि महाराष्ट्राचे नाव पर्यटनामध्ये पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी हातभार लावू शकता.

हे पुस्तक समस्त ठाणेकरांना आर्पित

ज्यांचा सहभाग ठाणे शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यात आहे.

स्वच्छ ठाणे - सुंदर ठाणे

जुणे ठाणे – नविन ठाणे- आमचे ठाणे

बऱ्याच वेळा आपल्याला कुठे तरी घराच्या बाहेर फिरायला जावेसे वाटते पण प्रत्येक वेळी आपण शहरातून बाहेर जावु शकत नाही. त्यावेळी छोटीशी ठिकाणे देखिल आपल्याला आनंद देतात. अश्याच ठिकाणांच्या शोधात असताना मला माहित झालेली काही ठिकाणे मी इथे देत आहे. तुम्हालाही काही माहित असल्यास नक्की कळवा. मी ठाणे मधे राहते. म्हणुन मी सुरवात गजबजलेल्या आणि तेवढंच जुने असलेल्या ठाण्यापासुन करते. सर्वात अगोदर ठाणे शहर.

तर चला ठाणे सांस्कृतिक नगरीत आपले स्वागत आहे.

ठाणे हे ठाणे जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. ठाणे शहराचा कारभार ठाणे महानगरपालिका चालवते. ठाणे हे मुंबईच्या मध्य रेल्वे उपनगरीय व हार्बर मार्गावरील एक स्थानक आहे.

ठाणे हे अतिशय जुने शहर आहे. ह्या शहराचे उल्लेख मध्ययुगीन काळातील शिलालेखात आणि ताम्रपटात सापडतात. हे शहर शिलाहार राजांची राजधानी होती. इटालियन प्रवासी मार्को पोलोने १२९० मध्ये ठाण्याला भेट दिली. ठाणे हे विकसित झालेले सुंदर शहर असल्याचा उल्लेख तो करतो. तसेच ठाणे हे मोठे बंदर असून तेथील व्यापारी कापूस, ताग आणि चामडे विकतात आणि घोडे खरेदी करतात असे तो म्हणतो.

पोर्तुगीज ठाण्यात १५३० मध्ये आले आणि त्यांनी शहरावर १७३९ पर्यंत सुमारे २०० वर्षे राज्य केले. मराठ्यांनी शहरावर १७३९ ते १७८४ राज्य केले. १७८४पासून स्वातंत्र्यापर्यंत शहर इंग्रजांच्या ताब्यात होते. भारतातील पहिली

रेल्वे बोरीबंदर (आताचे छत्रपती शिवाजी टर्मिनस) ,मुंबई ते ठाणे दरम्यान १८५३ मध्ये धावली.

ठाणे महानगरपालिका १९८२ साली स्थापन झाली. ठाण्याला तलावांचे शहर असेही म्हणतात. ठाण्यातला मासुंदा तलाव हा सर्वात सुंदर आहे. ठाणे परिसरात अनेक निसर्गरम्य टेकड्या आणि डोंगर आहेत. सन १९८२ पासून ठाणे महापालिकेने शहराच्या विकासासाठी अनेक प्रकल्प आणि योजना हाती घेतल्या असून त्यापैकी एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प एक हा प्रमुख प्रकल्प आहे. हा सर्व पायाभूत विकास लक्षात घेऊन भारत सरकारकडून सन २००० मध्ये ठाणे शहराला प्रतिष्ठित ' स्वच्छ शहर पुरस्कार ' प्रदान करण्यात आला.

श्रीस्थानक ते एका आधुनिक शहरापर्यंतचा ठाणे शहराचा हा विकास थक्क करणारा आहे. सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि साहित्यिक वारसा लाभलेलं हे शहर खरोखरीच देशाच्या नकाश्यावर मानाने विराजमान झाले आहे.

.कुंजविहार आणि राजमाता ह्यांचे वडापाव आणि टिप-टॉपचे खाद्यपदार्थ आणि मिठाई विशेष प्रसिद्ध आहेत.ठाण्यात आता विविध मल्टिप्लेक्स थियेटर्स आणि शॉपिंग मॉल्स आहेत.

ठाणे शहरात ठाणे महापालिका परिवहन (टी. एम. टी.) शहर वहातूक व्यवस्था पुरवते. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ (एस. टी.) ठाणे ते बोरिवली, भायंदर, पनवेल ह्या मध्यम पल्ल्याच्या सेवा आणि इतर शहरांसाठी लांब पल्ल्याच्या बससेवा पुरवते. ठाणे हे मध्य रेल्वेचे मुख्य स्थानक आहे. ठाणे - वाशी ही लोकलसेवा नवीन सुरु झाली आहे.

"ठाणे जिल्ह्यातील तालुके"

अंबरनाथ तालुका

उल्हासनगर तालुका

कल्याण तालुका

ठाणे तालुका

भिवंडी तालुका

मुरबाड तालुका

शहापूर तालुका

<u>ठाणे मुख्य स्वागतयात्रा</u>

ठाणेची गुढीपाडव्याला निघणारी यात्रा देखिल बघण्यासारखी असते.मोठ्या संख्येने ठाणेकर यात सहभागी होतात. सर्वजण पारंपारिक वेषात नटुन-थटुन येतात. हा सोहळा बघण्यासारखा असतो.ठाण्याबरोबरच अनेक ठिकाणी हा कार्यक्रम होतो.

आयोजक : श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास, ठाणे

प्रारंभ ठिकाण : कौपिनेश्वर मंदिर, वेळ : सकाळी ६.४५

<u>ब्रह्मांड-आझादनगर परिसर स्वागत यात्रा</u>

आयोजक : श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास ठाणे, अंतर्गत ब्रह्मांड-आझादनगर नववर्ष स्वागत यात्रा समिती

वेळ : सकाळी ७.३० वाजता ’ठिकाण : आझादनगर साईमंदिर

<u>सावरकरनगर गुढीपाडवा नववर्ष स्वागत यात्रा</u>

आयोजक : श्री कौपिनेश्वर न्यास उपसमिती

वेळ : सकाळी ८ ’ठिकाण : साठेनगर सुपर्णेश्वर मंदिर

<u>खारेगाव नववर्ष स्वागत यात्रा</u>

आयोजक : श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास, अंतर्गत खारीगांव पारसिक नगर परिसर नववर्ष स्वागत यात्रा समिती

<u>माजिवडा सेवाभावी ज्येष्ठ नागरिक संस्था</u>

आयोजक : माजिवडा सेवाभावी ज्येष्ठ नागरिक संस्था

वेळ : सकाळी ६.४५

ठिकाण : श्रीचांगाईमाता मंदिर

डोंबिवली

मुख्य आयोजक : श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली

प्रारंभ ठिकाण : गणेश मंदिर मंदिर, वेळ : सकाळी ६.१५

हिंदू नववर्ष स्वागत यात्रा (कल्याण पश्चिम)

आयोजक : कल्याण संस्कृती मंच

ठिकाण : सिंडिकेट, कल्याण (प.),

वेळ : सकाळी ६.३० वाजता

भारतीय नववर्ष स्वागत यात्रा समिती, अंबरनाथ

प्रारंभ ठिकाण : स्वामी समर्थ चौक, अंबरनाथ (पू.)

बदलापूर मुख्य स्वागत यात्रा

आयोजक : श्री हनुमान मारुती देवस्थान व नववर्ष स्वागत यात्रा समिती

प्रारंभ ठिकाण : दत्त चौक, बदलापूर(प.) ’वेळ : सकाळी ६.३०

तलावांचे शहर

तलावांचे शहर ही एक ठाण्याची मोठी ओळख आहे. मासुंदा तलाव, कचराळी तलाव, उपवन तलाव, मखमली तलाव, सिद्धेश्वर तलाव, रेवाळे, गोशाला, आंबे, घोसाळे, ब्रह्माळे, कचराळी, उपवन तलाव

मासुंदा तलाव

ठाणे स्टेशनच्या जवळच मासुंदा तलाव आहे. ठाणेकर त्याला तलावपाळी या नावाने ओळखतात. संपुर्ण तलावाभोवती बसण्याची सोय आहे. तलावाच्या मध्यभागी महादेवाचे मंदिर आहे. बाजुला गडकरी रंगायतन म्हणजे नाट्यगृह आहे. ठाण्यातील बहुतेक सर्वच तलावांमध्ये बोटींगची सोय आहे. विद्युत कारंजे देखिल आहेत. आठशे वर्षांपूर्वी चंपावती (चेऊल)च्या भोजराजाने ठाण्यावर स्वारी केली. तो कळव्याला येत असतानाच महिबिंबाने ८००० सैनिकांसह त्याला गाठले. महाभयंकर युद्ध झाले. त्यात भोजराजा मारला गेला. नंतर भोजराजाचा प्रधान महिबिंबावर चालून आला. त्याचा शेषवंशी केशवराव याने वध केला, तर भोजराजाच्या पालकपुत्राला मरोलच्या हंबीररावाने यमसदनास पाठविले. त्यामुळे भोजराजाचे उरलेसुरले सैन्य भयभीत होऊन पळून गेले. हा विजय महिबिंबाने ठाण्यातील ‘मासवदा’ (मासुंदा) तलावाकाठी मोठ्या थाटामाटात साजरा केला.

ब्रम्हाळा तलाव

हा तलाव कॅसल मिलकडे जाताना डाव्या हाताला लागतो. ब्रम्हाळा तलावाच्या थोडे पुढे गेल्यावर आंबेघोसाळे तलाव आहे.

आंबेघोसाळे तलाव

हा तलाव कॅसल मिल येथे आहे. तलावाच्या आजुबाजुला अनेक खाद्य स्टॉल, आणि आ~क्टिवीटी खेळ आहेत.बाजुला मिनी ट्रेन आहे. तलावाच्या बाहेर लाकडी टोपली विकणारे बसलेले असतात.

उपवन तलाव

उपवन तलाव हा स्टेशन पासुन ७ किमी. अंतरावर आहे. येऊर डोंगराच्या पायथ्याशी हा तलाव आहे. इथे नेहमीच थंड वाटते. संपुर्ण तलावाला फेरी मारण्यासाठी येथे फुटपाथ आहे. बाजुलाच गणेश मंदिर आहे. येथे अनेक मालिकांचे शुटिंग चालते. झी मराठी वरील 'होणार सुन मी ह्या घरची' ह्या मालिकेचे शुटींग येथे झाले आहे. अनेक प्री वेडिंग शुटींग देखिल येथे चालु असते. व्यायाम, भटकंती, खेळ, सराव, देवदर्शन आणि दोन घटकेचा निवांतपणा घालविण्यासाठी शेकडो ठाणेकर या भागाला पसंती देतात. उपवन तलावाचे सौंदर्य अजूनही अबाधित आहे. आतातर उपवन फेस्टीवलमुळे हा तलाव अधिकच प्रसिद्ध झाला आहे. दरवर्षी येथे डिसेंबर- जानेवारी महिन्यात ४ दिवस उपवन महोत्सव असतो. सर्व कलाकारांना येथे आमंत्रित केले जाते. ठाणेकरांसाठी ही मेजवानीच असते. तलावालगतच्या भागामध्ये उपवन महोत्सवानंतर बनवण्यात आलेल्या मैदानावर क्रिकेट, फुटबॉल, ज्युडो, किकबॉक्सिंगसारखे खेळ खेळण्याची आणि शिकवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

<u>संगीतकार श्रीनिवास खळे संगीत उद्यान,उपवन</u>

उपवन तलावाजवळ हे नविन उद्यान ठाणे महानगरपालिकेने अलिकडेच विकसित केले आहे.

ठाण्यातील मंदिरे

गावदेवी मंदिर, घंटाळी मंदिर इथे वर्षभर गर्दी असते.राम मारुती रोडवरील गजानन महाराज मंदिर ही मंदिरे प्रसिद्ध आहेत.

खारकर आळीतील ढोल्या मारुती मंदिर, खंडोबा मंदिर येथे देखिल वर्दळ असते.चैत्र महिन्यात शिवाजी मैदानावर तलावपाळीच्या बाजुला बसणाऱ्या देवीला देखिल गर्दी असते. त्यावेळी यात्रा लागते. तसेच दसऱ्यामध्ये टेंभीनाक्यावर (तलावपाळीच्या बाजुला) देवी बसते त्यावेळी देखिल दहा दिवस मोठी यात्रा भरते. त्यावेळी देवीची सजावट बघण्यासारखी असते.

डवलेनगर-लोकमान्यनगर- येथे स्वामींचा मठ आहे.लोकमान्य बस डेपोच्या बाजुलाच मठ आहे. समोरे मोकळे मैदान आहे. दर गुरवारी येथे भक्तांची गर्दी दिसुन येते. डेपोकडुन आत मठाकडे जाताना भिंतीवर साई बाबांची शिल्प थोडक्यात कोरलेली आहेत. उंबराच्या झाडाखाली दत्ताचे आणि साईबाबांची मुर्ती आहे.मठाच्या बाजुला हनुमानाचे मंदिर आहे. तसेच यशोधनगर येथे गणपतीचे मंदिर आहे. मंदिराच्या बाजुला आदर्श सार्वजनिक वाचनालय आहे.येथे अगदी अल्प दरात मेंबरशिप घेउन पुस्तके वाचायला मिळतात.

साई बाबा मंदिर, (मिनी शिर्डी) वर्तकनगर, ठाणे

वर्तकनगरचे साईबाबा मंदिर हे फार प्रसिद्ध आहे. मंदिरासमोर मोठी दिपमाळ आहे.दर गुरुवारी येथे भक्त झुणका भाकरीचे वाटप करतात.मंदिर परिसरात शनी, हनुमान, गणपती, शंकराचे मंदिर आहे.समोरच मोठा सभामंडप आहे. तेथे साईबाबांच्या जीवनाविषयी माहितीचे फलक लावले आहेत. दरवर्षी येथे

वर्धापन सोहळा नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यात असतो. तीन दिवस हा कार्यक्रम चालतो. फार मोठी यात्रा त्यावेळी भरते. येथे लांबुन लांबुन लोक येत असतात.

अयप्पा मंदिर, वर्तकनगर, ठाणे

अयप्पा मंदिर टी.एम.टी. बस डेपोच्या बाजुला वर्तकनगर, ठाणे येथे आहे. फोन नंबर- ०२२-२५८५६४०३

अयप्पा मंदिरच्या बाजुलाच वेगळे गणपती मंदिर, बौद्ध धाम, शंकर मंदिर, कानिफनाथ मंदिर आहे. हा मंदिर समुह मोठा आहे. सर्व परिसर अतिशय स्वच्छ आहे.

जानकीदेवी मंदिर वर्तकनगर, ठाणे

अयप्पा मंदिरच्या थोडे पुढे गेल्यावर जानकीदेवी मंदिर आहे. समोर बराच मोठा परिसर मोकळा आहे. येथे मुले क्रिकेट खेळत असतात. बाजुला लिटल फ्लॉवर स्कुल आहे. बाजुला चर्च आहे. जानकीदेवी मंदिर हे ४०० वर्ष जुने मंदिर आहे. पोर्तुगिजांच्या काळात हे

मंदिर उध्वस्त झाले होते. पण तिथे रहाणाऱ्या लोकांनी ते पुन्हा बांधले.

शनी मंदिर ठाणे वर्तकनगर

मरी आई मंदिर, कोलशेत

नागोबा मंदिर

नागोबा मंदिर वाघबीळला ठाणे खाडीच्या बाजुला आहे. स्थानिक लोकांची मुख्यत्वे कोळी लोकांची ही देवता आहे. खडकामध्ये ही देवता आहे. येथे खुप वारा वहात असतो.



<u>अयप्पा मंदिर, श्रीनगर ठाणे</u>

गळे इस्टेट ठाणे पच्मिम येथे श्रीनगरला श्री अयप्पा मंदिर आहे. त्यामध्ये मोठे शिवलिंग आहे. थोड्या पायऱ्या चढुन जावे लागते. मंदिर परिसर मोठा आहे.

मंदिराच्या मागे स्वंयभु अमरनाथ मंदिर आहे. हा जरा झाडीत जाणारा मार्ग मस्त वाटतो.

वेळ: सकाळी ५.३० ते १०.३० आणि संध्याकाळी ५ ते ९ वाजेपर्यन्त

विरंगुळयाची केंद्रे

वर्तकनगर, ठाणे नानासाहेब धर्माधिकारी लायब्ररी

इथे बसुन मोफत पुस्तके वाचता येतात. लायब्ररीचा एरिया मोठा आहे. खाली एम.पी. एस.सी. तसेच स्पर्धा परिक्षेच्या मुलांना अभ्यास करण्यासाठी जागा आहे. तसेच लहान मुलांसाठी राजा राममोहन प्रतिष्ठान तर्फे खेळणी आणि बसायला लहान टेबल आहे.सार्वजनिक सुट्टी आणि रविवारी तसेच दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी लायब्ररी बंद असते.

ठाणे कम्युनिटी पार्क

पोखरण रोड क्रमांक २ , सिद्धाचल हाउसिंग सोसायटी जवळ, वसंत विहार, ठाणे पश्चिम येथे आहे. छोटेसे पण सुंदर आहे. वेळ सकाळी ६ ते १० आहे आणि दुपारी ४ ते ८ आहे. येथे थोड्या अंतरावरच हनुमान मंदिर आहे. वसंतविहार येथे जॉगर्स पार्क आहे.

जुणे ठाणे- नविन ठाणे लघुचित्र पार्क, पातलीपाडा

अलिकडेच विकसित करण्यात आलेले हे थिम पार्क आहे. मार्च २०१८ मध्ये हे पब्लिक साठी खुले करण्यात आले. हे घोडबंदर हायवेला लागुनच आहे. डोकाली पाडा, पातलीपाडा येथे आहे. हे सर्वासाठी विनामुल्य आहे. प्रवेश सकाळी ९.३० ते रात्री ८ वाजेपर्यन्त दिला जातो.

पातलीपाडा - ठाणे महानगरपालिका गार्डन

हे गार्डन देखिल सुंदर आहे.

सिग्नल शाळा- तीन हात नाका

ठाणे महनगरपालिकेने अलिकडेच सिग्नल, रस्त्यावर फिरणाऱ्या मुलांसाठी ही शाळा चालु केली आहे. सध्या या सिग्नल शाळेत ३४ विद्यार्थी तीन हात नाका चौकातीलच आहेत. ... विकण्यापासून शिकण्याकडे वाटचाल करणाऱ्या ठाण्यातील सिग्नल शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अद्याप सुरूअसून आता इतरही काही सिग्नल्सवरील मुलेही या शाळेत येणार आहेत. ... सिग्नलवर भीक मागणाऱ्या किंवा वस्तूंची विक्री करणाऱ्या मुलांना शिक्षणाचे धडे मिळावे यासाठी समर्थ भारत व्यासपीठ आणि ठाणे महानगरपालिकेच्या वतीने तीन हात नाकाजवळ सिग्नल शाळा सुरू करण्यात आली.

नितिन कंपनी उड्डाणुपलाखालचे गार्डन

नितिन कंपनी येथील उड्डाणुपलाच्या एक किमीच्या खालील बाजूस उद्यान विकसित केल्यानंतर ठाणे महापालिकेने आता माजिवडा उड्डाणपुलाखाली देखील अशा पध्दतीने उद्यान विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान सुशोभित करण्यात आलेल्या या परिसरात आता रंगेबेरंगी विद्यात रोषणाई करण्यात आली आहे. विविध प्रकारची फुल झाडे, नागरिकांना चालण्यासाठी मार्गिका, बच्चे कंपनीसाठी खेळणी, अशी व्यवस्थाही याठिकाणी करण्यात आली आहे. या सुशोभिकरणामुळे येथील रु पडे पालटले असून सायंकाळच्या वेळेस ही ठिकाणे नागरिकांची लक्ष वेधून घेत आहेत.

स्व.उत्तमराव पाटील निसर्ग संरक्षण व जैवविविधता उद्यान

ठाणे येथे जैवविविधतेचा अनुभव घेता यावा, यासाठी कळवा नाक्याजवळ स्व.उत्तमराव पाटील निसर्ग संरक्षण व जैवविविधता उद्यान शासनाच्या वन विभागातर्फे तयार करण्यात आले आहे. ठाणे वन परिक्षेत्राच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत या उद्यान प्रकल्पाचे काम सुरू आहे. कळवा खाडीजवळ येथे बालोद्यान, फुलपाखरू उद्यान या केंद्रात तयार करण्यात आले आहे.

ऐरोली - किनारी आणि सागरी जैवविविधता केंद्र

जैवविविधतेचे सुंदर दर्शन घडवण्यासाठी या ठिकाणी नौकाविहाराची सोयही करण्यात आली आहे. सुमारे लाखभर पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेला ठाणे खाडी परिसर राज्य सरकारने यापूर्वीच 'फ्लेमिंगो अभयारण्य' म्हणून जाहीर केला आहे. त्यामुळे फ्लेमिंगो, तसेच इतर विविध पक्षी पाहण्याची संधीही येथे मिळणार आहे. हे केंद्र नवी मुंबईतील दिवा-नगर रोडवर डीएव्ही पब्लिक स्कूलजवळ ऐरोलीच्या सेक्टर १०मध्ये आहे.

मामा भांजे डोंगर, मामा भांजे टेकडी, ठाणे (पच्छिम) लोकमान्यनगर

ठाणे पच्छिमला हनुमान टेकडीवर ४०० मीटर वर समुद्र सपाटीपासुन मामा भांजे टेकडी आहे. हा डोंगर सर्व बाजुंनी दिसतो. तिथे दोन टेकड्या आहेत. एक मामा टेकडी आणि एक भांजा टेकडी. मामा टेकडी थोडी उंच आहे त्यापेक्षा भांजे टेकडी थोडी खाली आहे. आपण तासभरात वरती जातो. वरती जाण्यासाठी दगडी पायर्यांची सोय केली आहे.खाली लोकमान्यनगर येथे आपण आपले वाहन पार्क करु शकतो. येथुन पुर्ण ठाणे शहर दिसते.

फुलपाखरु उद्यान, ओवळा ठाणे

हे उद्यान ओवळा येथे आहे. ओवळा म्हणजे घोडबंदर रोड वरील ठाण्याचे शेवटचे ठिकाण.

पेशाने शिक्षक असलेल्या राजेंद्र ओवळेकरांचा पारंपरिक व्यवसाय हा भात-शेतीचा. ते शेतीचा व्यवसाय आठ-दहा वर्षांपूर्वीपर्यंत करत होते. त्यांनी काहीतरी नविन म्हणून शेतबांधावर नारळ, आंबा, चिकू अशी फळझाडे लावली.

वाडीतील शेतावर येता-जाता त्यांची नजर जायची ती तेथे भिरभिरणाऱ्या फुलपाखरांवर. ओवळेकरांना निसर्गाची आवड होतीच; त्यांनी ‘बॉंबे नॅचरल हिस्टरी सोसायटी ’ने योजलेल्या ‘फुलपाखरांशी ओळख’ या कार्यक्रमाला भेट दिली. फुलपाखरांचे प्रकार, रंगरूप, त्यांची नानाविध नावे या सर्व माहितीमुळे त्यांचे फुलपाखरांविषयीचे आकर्षण वाढले. त्याच कार्यक्रमात एका व्यक्तीने, ‘ही सर्व फुलपाखरे ठाण्याला ओवळा गावात दिसतात व ती पाहायला आम्ही मुंबईहून मुद्दाम तिथे जात असतो’ असे सांगताच त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्यांनी आपल्या गावातील या नैसर्गिक देणगीशी आपली पक्की ओळख करून घ्यायचा निश्चय केला आणि मग त्यांनी रीतसर अभ्यास आरंभला.

त्यांनी फुलपाखरांचे प्रकार किती? ती कोणत्या फुलांवर येतात, का येतात, कोणत्या झाडांखाली दिसतात? ती सतत दिसावीत म्हणून काय करावे लागते याचा पाठपुरावा करण्यास सुरुवात केली. ते अनेक ठिकाणांहून, व्यक्तींकडून माहिती घेऊ लागले. त्यांना त्या वाटचालीत फुलपाखरांच्या दुनियेतील एका अग्रगण्य व्यक्तीने सखोल सहकार्य दिले. ती व्यक्ती म्हणजे आयझॅक किहीमकर . त्यांनी भारतात आढळणाऱ्या पंधराशेएक जातींच्या फुलपाखरांचा अभ्यास करून सर्वांगसुंदर पुस्तक लिहिले आहे. या ऋषितुल्य व्यक्तीने ओवळेकरांना वेळोवेळी माहिती दिली, मदत केली

ठाणे मॉल

ठाण्याचे मॉल कोरम मॉल, विविआना मॉल, आर मॉल, इटर्निटी मॉल ही नविन ठाण्याची ओळख आहे.

सूरज वॉटर पार्क

सूरज वॉटर पार्क, हे घोडबंदर महामार्गावर आहे. सूरज वॉटर पार्क ह्याच नावाने बस थांबा आहे.

<u>टिकुजीनी वाडी</u>

टिकुजीनी वाडी हे एक करमणूक पार्क, वॉटर पार्क आहे. टाटा पावर हाउसच्या समोर, मानपाडा, चितळसर येथे आहे.

आसपासची पिकनिकची ठिकाणे

वज्रेश्वरी

पुराणात या ठिकाणाचा वाडवली या नावाने उल्लेख केलेला आढळतो. इंद्रदेवाच्या वज्रातून विजेच्या रूपाने देवी पार्वती येथे प्रकट झाली होती. तेंव्हापासून या ठिकाणाला वज्रेश्वरी हे नाव पडले. अशी येथील लोकांची मान्यता आहे. येथून ५ किलोमीटरच्या परिसरात गरम पाण्याचे २१ कुंड आहेत. वसई व भिवंडी या दोन्ही ठिकाणापासून वज्रेश्वरी हे ठिकाण जवळ आहे.

पोर्तुगीजांवर विजय मिळवण्यासाठी चिमाजी अप्पा यांनी याच देवीला साकडे घातले होते. व पोर्तुगीजांकडून वसईचा किल्ला जिंकल्यावर त्यांनी हे मंदिर बांधण्याचे देवीला दिलेले वचन पूर्ण केले. हे मंदिर शहरापासून लांब असले तरी या ठिकाणाची माहिती असलेले पर्यटक येथे आवर्जून येतात.

अंबरनाथ पर्यटन

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथे शिलाहार राजांनी अकराव्या शतकात बांधलेले पुरातन हेमाडपंथी शैलीचे शिवमंदिर आहे. या मंदिरातील शिवलिंग स्वयंभू आहे. हे मंदिर जमिनीच्या पातळीवर बांधलेले आहे.येथे आगपेट्यांचा तसेच दारूगोळयाचा कारखाना आणि अनेक रासायनिक उद्योगही आहेत.

प्राचीनकालीन अंबरनाथ शिवमंदिर हे शहराचे वैभव आहे. पूर्वीचा घनदाट, झाडी-झुडपांचा नैसर्गिक ठेवा नष्ट होत असताना झुळझुळ वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा स्त्रोत देखील बंद झालेला आहे. शिवमंदिराच्या आजुबाजूचा परिसर कायम अस्वच्छ असतो. वालधुनी नदी सध्या सांडपाण्याचा नाला सदृश्य नदीतून दर्प दुर्गंधी येत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ह्या मंदिराचा

अजुन कुठलाही ट्रस्ट स्थापन झाला नसुन या मंदिरावर अजुनही पाटील परिवाराचे वर्चस्व आहे.

पेशवेकालीन विहीर, बदलापुर

ही शिवकालीन विहिर देवळोलीला आहे. हे गाव बदलापुर स्टेशनपासुन जवळ आहे.

विष्णुबाग पर्यावरण थीम पार्क

देवळोली सावरा रोड, बदलापुर ४२१५०४, फोन नंबर – ९८६९०६७६९८

हार्मोनी व्हिलेज

हार्मोणी व्हिलेज, बदलापुर कोन गाव, राहोटी जंक्शन, बारवी डॅम रोड, बदलापुर वेस्ट, ठाणे. मो. नंबर-९५९५०००६००

येथे स्विमींग पुल, रेन डान्स, कॉन्फरन्स रुम, प्ले एरिया आहे.

गुरु पंचायत मंदिर, समर्थ वाडी, कासगाव बदलापूर

गुरु पंचायत मंदिर, समर्थ वाडी, कासगाव बदलापूर हे एक वेगळे ठिकाण आहे. येथे महिलांना साडी घातली असेल तरच प्रवेश दिला जातो. पुरुष वर्गासाठी सफेद कुर्ता पायजमा किंवा लुंगी असेल तर प्रवेश दिला जातो. त्यांच्यासाठी तिथे भाड्याने लुंगी मिळते. ते परिधान केल्यावरच आत सोडले जाते. आम्हाला ह्याची अगोदर कल्पना नसल्याने आम्हाला आतून वाडी बघता आली नाही. एक तास

अगोदर सांगितल्यास येथे जेवण बनवुन दिले जाते. प्रवेशद्वाराजवळ एक हत्ती आपले स्वागत करतो.

कोंडेश्वर मंदिर, डोह आणि तलाव

जांभवली गावाच्या पलीकडे कुंडली नदीच्या उगमापाशी कोंडेश्वर महादेवाचे देऊळ आहे. तीनही बाजूंनी उंचावलेल्या डोंगरात पाण्याच्या नैसर्गिक कुंडापाशी महादेवाचे देऊळ आहे. कोंडेश्वराच्या गाभाऱ्यात देवाचा पंचमुखी मुखवटा आहे. बाहेर जुन्या काळातील उंच दीपमाळ आहे. आवारात जुनी शिल्पे आहेत. येथे पावसाळ्यात धबधब्यासाठी अनेक पर्यटक येतात.





बारवी धरण

बारवी धरण हे बदलापुरपासुन १८ कि.मी.वर आहे.बारवी धरण नवी मुंबई आणि ठाणेला पाणीपुरवठा करते. धरण हे झाडीने आणि उंच हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेले आहे. हे एक छान पिकनिकचे ठिकाण आहे.

माघी गणपती उत्सव

माघ महिन्यात पण गणपती येतात हे आम्हाला कॉलेजला असताना समजले. ती आमच्यासाठी एक नविनच माहिती होती. आम्ही मग बघण्यासाठी त्यावेळी गेलो पण ते काही आम्हाला त्यावेळी मिळाले नाही. नंतर जाण्याचा योग आला. इथे १० दिवसांची यात्रा लागते. संध्याकाळी वातावरण फारच उत्साही असते. माघ महिना हा हिंदु कॅलेंडर मध्ये साधारण फेब्रुवारी-मार्च महिन्यात येतो. बरेच ठिकाणी आता माघ महिन्यात गणपती बसतो पण सर्वात प्रथम बदलापुरच्या गणपती बद्दलच ऐकले होते.

श्री संत गजानन महाराज मंदिर

श्री संत गजानन महाराज मंदिर,कान्होर, बदलापुर, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र, फोन नंबर-९१ ०२५१-२६६५९८४

हे मंदिर बदलापुर गावाच्या बाहेर आहे. छोट्याश्या टेकडीवर हे मंदिर वसलेले आहे.हे मंदिर शेताने आणि आजुबाजुला हिरवळीने वेढलेले आहे.

मुळगाव खंडोबा मंदिर

बदलापुर स्टेशन पासुन ६ किमी.वर हे मंदिर आहे.वरती जाण्यासाठी ५००-६०० पायऱ्या चढुन जावे लागते. रविवारी लोकांची येथे वर्दळ दिसुन येते.

गणेश घोळ मंदिर

कल्याणहून नवी मुंबईकडे जाताना बऱ्याच गाडय़ा शिळफाटय़ाकडे न जाता कल्याण फाटय़ावरून एका खिंडीतील रस्त्याने जातात. या रस्त्यावर कल्याण फाटय़ावरून काही अंतर चालल्यानंतर एक पायऱ्या पायऱ्यांचा थर डोंगरावर गेलेला दिसतो. या पायऱ्या जेथून सुरू होतात, तिथे ‘गणेश घोळ मंदिर’ नावाची

पाटी दिसते. यावरून वर डोंगरावर एखादे मंदिर असणार, याची कल्पना येते. बाजूने दाट वनराई आणि त्यामधून जाणारा नागमोडी वळणांचा हा पायऱ्यांचा रस्ता चालताना खूपच मस्त वाटते. किमान शंभर एक पायऱ्या असतील, पण त्या



चढताना अजिबात दमायला होत नाही. घनदाट झाडी आणि डेरेदार वृक्ष बाजूला असल्याने गारवा वाटतो. एकेक पायरी चढताना आजूबाजूची अनेक फुलझाडे, वेगळय़ा प्रकारचे वृक्ष न्याहाळत आपण पुढे पुढे जात राहतो.. साधारण १५ ते २० मिनिटांनंतर आपण डोंगरावरील मंदिरापर्यंत पोहोचतो. हे मंदिर अगदी साधेसुधे असून अगदी लहान आकाराचे आहे. मंदिरात गणेशाची एक जुनी व एक नवी अशा दोन मूर्ती आहेत.. नवी मूर्ती नंतर बसविण्यात आली असावी, असे वाटते. मंदिराचा एक भाग दगडाच्या खोबणीत बसविला आहे.. या मोठय़ा दगडातही कोरून काही शेंदूर फासलेल्या मूर्त्यां बसविण्यात आल्या आहेत.

मंदिराचा परिसरही अतिशय सुंदर आणि ताजातवाना करणारा आहे. पण या मंदिराच्या बाजूला काही साधूंनी त्यांचे आश्रम उभारले असल्याने मंदिराच्या भोवतालची शोभा गेलेली आहे. हे साधू बऱ्याच वेळा तिथे होम-हवन करत

असल्याने मंदिर परिसरात धुराचे साम्राज्य असते, त्याचबरोबर येथील शांततेत आणि निवांतपणात या आश्रमामुळे बाधा येत असल्याचे वाटते. पण बाकी हा परिसर अतिशय रमणीय आणि मन प्रसन्न करणारा आहे. येथे काही वेगवेगळय़ा प्रकारची फुले पाहायला मिळतात, तर काही वेगळय़ाच वनस्पती आढळतात. कल्याणहून नवी मुंबईकडे जाताना, कल्याण फाटय़ाहून मधल्या खिंडीतील रस्त्याने जावे. या रस्त्यावर काही अंतरावर या मंदिराचे प्रवेशद्वार दिसेल. ठाणे, मुंब्रा येथूनही कल्याण फाटा येथे येऊन जाता येईल.

अणजूर गणपती मंदिर

भिवंडी जवळील अणजूर या गावी पेशवेकालीन इतिहास लाभलेले सिद्धिविनायक मंदिर आहे. पेशव्यांचे इनामदार असलेल्या नाईक यांच्या नाईकवाड्यात हे मंदिर आहे. राष्ट्रीय महामार्ग तीनवरून भिवंडी वरून माणकोली गावाकडे रस्ता जातो. तिथून पुढे अणजूर गावाकडे जाता येते. हा सर्व परिसर औद्योगिक पट्टा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे नेहमीच या भागात वाहनांची वर्दळ असते. आजुबाजुचा परिसर हा भकास, उजाड भासणारा, कंटाळवाणा आहे. पण रस्त्याने पुढे आल्यानंतर कौलारू छपराची नाईकवाडी दिसते. पण तिथे आजुबाजुला कोणालाही ह्याबद्दल जास्त माहिती नाही. किंवा कोणताही दिशादर्शक फलक लावलेला नाही.

पूज्य संत मोरया गोसावींचे पणतू यांनी अम्बाजी नाईक यांचे चिरंजिव गंगाजी यांना आपल्या पूजेतील उजव्या सोंडेच्या सिद्धिविनायकाची मूर्ती अनुग्रहपूर्वक दिली. या प्रसादमूर्तीची स्थापना सन १७१८ मध्ये नाईकांच्या वाडीत झाली.

डोंबिवली पर्यटन

गणपती मंदिर :

फडके रोडवरील हे डोंबिवली मधिल प्रसिद्ध मंदिर आहे. मंदिर कमिटीच्या वतीने येथे बरेच धार्मिक, सामाजिक कार्यक्रम चालु असतात.येथे जाण्यासाठी आपल्याला ठाकुर्लीच्या दिशेने रेल्वे लाईनच्या बाजुने जावे लागते. रिक्षा देखिल जातात. १९२६-२७ मध्ये ह्या मंदिराची कमिटी बनवण्यात आली.

स्वामी रामदास मठ :

हा एकच मठ डोंबिवली मध्ये आहे. नांदिवली रोडवर हा मठ आहे.

गाव देवी मंदिर : हे मंदिर १९८८ मध्ये बांधले. गावदेवी मंदिरची यात्रा प्रसिद्ध आहे.

सोमवार बाजार हा प्रसिद्ध आहे. बाजारात बऱ्याच वस्तु स्वस्तात मिळतात.

खिडकाळी मंदिर : ह्या मंदिरला जाण्यासाठी शिळफाट्याला जाणारी बस पकडावी लागते. हे शंकराचे मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम हे सतराव्या शतकातील वाटते. पण हे मंदिर पांडवाच्या अरण्यवास काळात बांधलेले आहे असे म्हटले जाते. अरण्यवासात असताना युधिष्टीरला शंकर पुजा करण्यासाठी ह्या मंदिराची निर्मिती केली गेली. खिडकाळी तलावाच्या काठी हे मंदिर असल्याने याला खिडकाळी मंदिर असेच नाव पडले आहे. आजुबाजुला दुसरी देखिल मंदिर आहेत. मुलांना खेळण्यासाठी छोटे गार्डन देखिल आहे.

नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
श्री गणेश

तुंगारेश्वर, वसई

तुंगारेश्वर हे एक शंकराचे मंदिर आहे. येथे एक छोटा किल्ला पण येतो. ठाणे विभागाच्या अंतर्गत येतो. येथे छोटे वॉटर होल / कुंड देखिल आहे ज्याला परशुराम कुंड असे म्हणतात. तुंगारेश्वर हे धबधबा आणि नदी यासाठी फ़ेमस आहे. सातिवली हे खालचे गाव आहे.एन.एच. ८ हायवेवरुन येथे जाता येते. मंदिर हे चेकपोस्ट पासुन २.५ किमीवर आहे.तुंगारेश्वर टॉप ह चेकपोस्टपासुन १०किमी,वर आहे. तार रोड हा सातिवली-बोरीवली नॅशनल पार्कच्या चेक पोस्टपर्यन्त आहे. रस्ता हा फक्त चेक पोस्ट पर्यन्तच आहे. चिंचोटी धबधबा हा ह्या फॉरेस्टच्या अंतर्गत येतो.

टिटवाळयाचा महागणपती

टिटवाळयाचा महागणपती! महाराष्ट्रातल्या अष्टविनायकांप्रमाणेच हे गणपतीचे क्षेत्रही प्रसिद्ध आहे. ह्या गणपतीच्या बाबतीत दोन आख्यायिका सांगितल्या जातात. दुर्वास ऋषींचे यथायोग्य स्वागत न केल्यामुळे शकुंतलेला शाप मिळाला. आणि राजा दुष्यंताला शकुंतलेचा विसर पडला. उत्साहाने पतीगृही गेलेली नवीन शकुंतला त्यामुळे आल्या पावली परत फिरली. कण्व ऋषींकडे परत आलेल्या या शकुंतलेने गणपतीची आराधना केली आणि दुष्यंताला सारे काही आठवले. शकुंतलेला तिचे प्रेम परत मिळवून देणारा हा गणपती आहे टिटवाळयाचा. त्यामुळेही या ठिकाणाला एक प्राचीन महत्त्व आहे. जरी त्याला एवढा जुना संदर्भ असला तरी तज्ञांच्यामते ही मूर्ती इ.स. ९ व्या शतकातील आहे.

तसेच दुसरी श्रीमंत माधवराव पेशव्यांना स्वप्न पडले व त्याच्या दुस-या दिवशी ही मूर्ती त्यांचे कारभारी रामचंद्र मेहेंदळे ह्यांना सापडली आणि मग पेशव्यांनी हे मंदिर बांधले. ह्या गणपतीला ‘विवाह विनायक’ असेही म्हणतात. कारण ज्यांच्या पत्रिकेत मंगळ-दोष आहे ज्यांचा विवाह जमत नाही किंवा विवाहानंतर ज्यांची ताटातूट झाली आहे, अशांचे ह्या गणपतीच्या दर्शनाने सर्व मंगल होते असा भक्तांची श्रद्धा आहे. टिटवाळा हे छोटेसे गाव मुंबईपासून ६५ किलोमीटर अंतरावर आहे. मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्थानकावरून सूटणा-या कसारा, आसनगाव व टिटवाळा ह्या गाड्यांनी या प्रसिद्ध मंदिरात जाता येते. टिटवाळा स्टेशनवर उतरले की, मंदिरात जाण्यासाठी रिक्षा मिळतात. पण आश्चर्य म्हणजे इथल्या रस्त्यावर अजूनही टांगे धावतात. टप.. टप..

आवाज करत धावणाऱ्या टांग्यांमध्ये बसून मंदिरापर्यंत जायला लहान-मोठे सगळयांनाच आवडते.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे गाभाऱ्यात प्रवेश केल्यापासून ते सभा मंडपातून बाहेर पडेपर्यंत मूर्तीचे सतत दर्शन आपल्याला होत राहते. मंदिराच्या आवारात एक छोटी दिपमाळ आहे. या मंदिरापासून काही अंतरावर एक तलाव आहे. हा एकंदर परिसरच खूप रमणीय आहे. आंबा, करवंद, जांभळे असला रानमेवा बघून भल्या भल्यांच्या तोंडाला पाणी सुटते. टिटवाळयाचा असा हा महागणपती! मन:शांती देणारा, भक्तांच्या हाकेला धावणारा आणि हो धकाधकीच्या जीवनात विरंगुळयाचे काही क्षण भक्तांच्या ओंजळीत अलगदपणे घालणारा!

कोंडाणा ट्रेक / गुहा

हा एक उत्तम आणि सोपा कर्जत तालुक्यातील ट्रेक आहे. एक ते दिड तासात आपण वरती गुहेजवळ जातो. कर्जत स्टेशनच्या बाहेर आपल्याला कोंदिवडे या पायथ्याच्या गावाला जायला रिक्षा मिळतात. १५०-२०० रुपये ते रिक्षावाले आकारतात.

तिथुन आपण सरळ जाऊ शकतो. तसा फलक तिथे लावला आहे. मळलेल्या वाटेने आपण जाऊ शकतो.

वरती केव्हच्या दिशेने जाताना मधे हा सुंदर धबधबा लागतो.



Photo By: Gautam

ठाणेमधील धबधबे

भिवपुरी - माथेरानच्या कुशीत असलेले हे ठिकाण मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर आहे. भिवपुरी रेल्वे स्टेशनजवळ हॉटेल्स आहेत. गावकर्यांना सांगितल्यास ते जेवणाची सोय करतात.

चिंचोटी - इथे पोहोचताना हिरव्या झाडाझुडपाच्या दाटीतून जावं लागतं. या मार्गावर ठिकठिकाणी धबधबे पाहायला मिळतील. मुख्य धबधब्याजवळ पोहचायला सुमारे तासभर चालावं लागतं. दहिसर टोलनाक्यानंतर ‘कामन’ जंक्शनजवळ हे ठिकाण आहे. ट्रेनने जायचं असेल तर नायगाव स्टेशनला उतरून रिक्षाने जावे लागते.

तुंगारेश्वर - नदी आणि धबधबा अशा दोन्ही ठिकाणचा आनंद घेता येतो. मुंबईपासून सुमारे २ तासांच्या अंतरावर तुंगारेश्वर आहे. पर्यटकांसाठी डोंगरावर कोणतीही जेवणाची व्यवस्था नाही.

रांधा फॉल - सह्याद्रीच्या पर्वतरांगात विल्सन डॅमपासून तयार झालेला हा धबधबा. या ठिकाणी जाण्यासाठी गाडी हा एकमेव पर्याय आहे. इगतपुरीजवळ असलेल्या विल्सन डॅमजवळ हा धबधबा आहे. या ठिकाणी जेवणासाठी हॉटेल्सची सोय नसली तरी इगतपुरीजवळ जेवणाची व्यवस्था होते.

पांडवकडा - खारघर परिसरात पांडवकडा हा धबधबा गेल्या दहा वर्षांत मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईकरांच्या लीस्टमध्ये अग्रभागी आहे. या

धबधब्यावर जाण्यास बंदी घातली असली तरी अनेक पर्यटक पांडवकड्याला भेट देतात. आजूबाजूच्या डोंगराने नेसलेला हिरवाकंच शालू पर्यटकांना भुरळ घालत असतो. हार्बर रेल्वे मार्गावरील खारघर स्टेशनवरून या ठिकाणी जाता येते.

झेनिथ - खोपोली शहरापासून २ किमीवर असलेल्या झेनिथ धबधब्याच्या पाण्याचा फोर्स खूप आहे, पण तरीही तरुणाईला पिकनिकसाठी झेनिथला जाण्याचा मोह काही आवरत नाही. म्हणूनच शनिवारी-रविवारी या धबधब्यावर मोठी गर्दी होत असते. इथल्या प्रत्येक कोपऱ्यावर पंजाबी धाबे आहेत.

पळसदरी - मुंबई-पुणे महामार्गावरच्या चौक फाट्यापासून १८ किमी दूर आणि पळसदरी रेल्वे स्टेशनपासून दोन किमी अंतरावर पळसदरी धबधबा आहे. रेल्वेमार्गाचा पर्याय असल्याने या ठिकाणी गर्दीचे प्रमाण जास्त असते. जेवणाची सोय या ठिकाणी होते.

गाढेश्वर - पनवेल तालुक्यात पावसाळी गर्दी गाढेश्वर नदीकाठी पाहायला मिळते. मनसोक्त डुंबण्यासाठी इच्छुक असणारे पर्यटक या ठिकाणी आवर्जून येतात.

फणसाड धबधबा - फणसाड अभयारण्यामधील या धबधब्यात चिंब होणं म्हणजे एक रोमहर्षक अनुभव आहे. या धबधब्यात सचैल स्नानानंतर अभयारण्यात पक्ष्यांचा किलबिलाट आणि झाडांची हिरवाई पाहण्यात एक वेगळा आनंद आहे.

सवतकडा - मुरुड-जंजिरापासून ११ किमी अंतरावरील सवतकडा धबधबा पर्यटकांनी शोधून काढला आहे. मुरुड-आगरदांडा रस्त्यावरील शिघ्रे गावातून सवतकड्याची पाऊलवाट जाते. या पाऊलवाटेवरून जाण्याचा थरार अविस्मरणीय आहे. जवळपास खाण्याची सोय नाही.

गवळीदेव - नवी मुंबईतील घणसोली गावाजवळ असणारा गवळीदेव धबधबाही आसपासच्या पर्यटकांना खुणावत आहे. शहराच्या इतक्या जवळ असूनही हा धबधबा आणि गवळीदेव डोंगर अनेक मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित आहे.

कोंडेश्वर - बदलापूरपासून सहा किलोमीटर अंतरावर कोंडेश्वरचा धबधबा आहे. इथे दोन धबधबे आहेत. बदलापूर पूर्वेकडून भोज-दहिवली शेअर रिक्षा उपलब्ध आहेत. कुंडात डोह असून त्यात कपाऱ्या असल्याने येथे पाण्यात उतरताना पुरेशी खबरदारी घ्यावी लागते.

भगीरथ - वांगणीपासून चार किलोमीटर अंतरावर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरलेला भगीरथ धबधबा आहे. बेडीसगावापासून धबधब्याकडे जाण्यासाठी पायवाट आहे. या ठिकाणी जेवणाची सोय नाही.

टपालवाडी - नेरळ रेल्वे स्थानकापासून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या आनंदवाडी आदिवासी वाडीजवळ यथेच्छ पोहण्यासाठी छान डोह असणारा एक धबधबा आहे. अलीकडच्या काळात पर्यटकांपैकीच कुणीतरी ‘टपालवाडीचा धबधबा’ असे त्याचे नाव ठेवले आहे. ठिकाण अतिशय निसर्गरम्य असले तरी येथे जेवण तसेच कोणतेही खाद्यपदार्थ मिळण्याची व्यवस्था नाही.

आषाणे - भिवपुरी-कर्जतदरम्यान भिवपुरीपासून पाच किमीवर असणाऱ्या आषाणे गावाजवळील धबधबा हेही पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. इथे जाण्यासाठी भिवपुरीपासून रिक्षा मिळते. आषाणे ग्रामस्थ पर्यटकांना मागणीनुसार जेवण करून देतात.

थिदबीचा धबधबा - पावसाळ्यात माळशेज घाटाकडे जाताना दूर डावीकडे डोंगरात खूप उंचावरून कोसळणारा धबधबा आपल्याला दिसतो.

कल्याण-माळशेज रस्त्यावर घाटाच्या पायथ्याशी साबर्णे गावापासून पुढे थिदबी गावापर्यंत ३ कि.मी. कच्च्या रस्त्याने चालत जावे लागेल.

निवळी - निवळी घाट चढताना पर्यटकांना आकर्षित करतो तो हिरव्या दाट झाडीतून कोसळणारा धबधबा. निवळी धबधब्याचे मनोहारी दृश्य पाहण्यासाठी घाटातच पर्यटकांसाठी खास पॉइंट तयार करण्यात आला आहे. ज्या पर्यटकांना प्रत्यक्ष धबधब्याजवळ जायचे असेल त्यांच्यासाठी पायर्यांचा मार्ग तयार करण्यात आला आहे.

मोहिली धबधबा - कर्जतपासून ६ ते ७ किमीवर उल्हास नदी पार करून मोहिलीत प्रवेश होतो. डोंगरावरून भिरभिरणारा वारा, हिरवीगार वनराई असे नयनरम्य दृश्य डोळयात साठवून ठेवावं, असे वाटते. धबधब्याजवळ थंड वातावरणात गरम गरम वाफाळता चहा आणि मक्याची कणसे खाण्याची मजाच काही औरच आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .
किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व विनामूल्य आहे. पण फ़ुकट नाही.